## इयत्ता : पाचवी (शहरी)

## लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्रश्न १): शब्द ऐकून लिही.** (गुण ६)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे व मजकुराचे लेखन तपासणे.

**सूचना** : यादीतील शब्द सांगताना प्रत्येक शब्द मोठ्याने तीन वेळा वाचावा.

**शब्द** :

| | |
|---|---|
| १) समुद्र | २) विमान |
| ३) टक्कर | ४) खडू |
| ५) वर्ग | ६) कैरी |
| ७) मित्र | ८) बॅटरी |
| ९) जास्वंद | १०) कॉट |
| ११) दप्तर | १२) भारत |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखन नियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'विमान' ऐवजी 'वि मान/इमान' किंवा 'समुद्र' ऐवजी 'समुदर/समूद्र'असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २) : उतारा ऐकून लिही.** (गुण ४)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्द असलेल्या मजकुराचे लेखन तपासणे.

**सूचना** :
- उतारा सांगताना प्रथम १ वाक्य त्याचा अर्थ ध्यानी यावा म्हणून एक एक वाक्य सलगपणे सांगावे.
- मग वाक्यातील शब्दांचे अर्थपूर्ण गट करून एक गट सांगून झाल्यावर काही सेकंद थांबावे. मग पुढील गट सांगावा. याप्रमाणे प्रत्येक वाक्य सांगावे.
- उतारा पूर्ण झाल्यावर संपूर्ण उतारा मुलांना सावकाशपणे वाचून दाखवावा व तपासण्यास सांगावे.

**उतारा** :

परवा आम्ही बाजारात गेलो होतो. मनूसाठी युनिफॉर्मचा फ्रॉक घेतला. नवीन दप्तर घेतले. वह्या आणि पुस्तकेही घेतली. उद्यापासून शाळा सुरू होणार म्हणून मनू आनंदात आहे.

**गुणदान :**

- १-८ शब्द बरोबर - एक गुण
- ९-१६ शब्द बरोबर - दोन गुण
- १७-२४ शब्द बरोबर - तीन गुण
- शिरोरेखा असतील तर - अर्धा गुण
- पूर्णविराम असतील तर - अर्धा गुण
- एकही शब्द बरोबर नसल्यास, शून्य गुण. (शिरोरेखा व पूर्णविरामचे गुणही देऊ नयेत.)

**प्रश्न ३ ते ५) कविता मनात वाच आणि खालील प्रश्नांच्या योग्य उत्तरास गोल कर.** (गुण ५)

**प्रश्न : पिर पिर पिर पावसाची त्रेधातिरपिट सगळ्यांची**

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्र. ३)** ब) छत्रीला धार लागल्यामुळे (गुण १)

**प्र. ४)** ब) पाणी साचलंय म्हणून (गुण २)

**प्र. ५)** क) पावसाचे (गुण २)

**प्रश्न ६ ते ८) ही बातमी वाच आणि खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिही.** (गुण ५)

**'पुण्यात अवेळी पाऊस'**

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्र. ६)** लोकांनी दुकानांमध्ये, इमारतींच्या खाली आसरा घेतला. (गुण १)
(असे पूर्ण वाक्यात किंवा 'दुकानांमध्ये, इमारतीच्या खाली' असे एक दोन शब्दात उत्तर लिहिले तरी एक गुण द्यावा)

**प्र. ७ ब)** पाऊस १२ जानेवारीला पडला. (गुण २)

**प्र. ८)** जोरदार पावसामुळे सगळीकडे चिखल झाला. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचले यामुळे वाहतुकीची कोंडी झाली. (गुण २)
(असे उत्तर लिहिल्यास किंवा पावसामुळे रस्त्यावर पाणी साचले असे उत्तर लिहिल्यास दोन गुण द्यावेत. फक्त पाऊस पडल्यामुळे कोंडी झाली असे लिहिल्यास एक गुण द्यावा.)

**प्रश्न ९ ते ११) जाहिरात वाच आणि खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिही.** (गुण ५)

**'चेटकिणीच्या घरात राजकुमार'**

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्र. ९) क)** नाटकाची (गुण १)

**प्र. १०)** प्रत्येक बालमित्राला / मुलाला एक आईस्क्रिम मोफत ही युक्ती केली आहे. (गुण २)

(असे पूर्ण वाक्यात किंवा फक्त 'मोफत आईस्क्रिम' असे काही शब्दांत उत्तर दिले असेल तरी दोन गुण द्यावेत.)

**प्र. ११)** 'पेटीतला राक्षस आणि राजकुमारची लढाई' (गुण २)

**प्रश्न १२ ते १९) व्याकरण, शब्दसंपत्ती आणि विरामचिन्हांवर आधारित प्रश्न.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्र. १२)** असिफने आंबा खाल्ला. (गुण १)

**प्र. १३)** डॉलीकडे पाच रुपये होते. (गुण १)

**प्र. १४)** काल मी दादाला भेटले/भेटलो. (गुण १)

**प्र. १५)** (गुण १)

**प्र. १६)** (प्रत्येक योग्य वाक्यास एक गुण याप्रमाणे एकूण दोन गुण)

**प्र. १७)** ती म्हणाली, " किती मस्त आहे हे पुस्तक!"

(दुहेरी अवतरण चिन्ह व उद्‌गारवाचक चिन्ह लिहिल्यास प्रत्येकी अर्धा याप्रमाणे एक गुण)

**प्र. १८)** सरिता टपरीवर गेली.

तिने वडापाव आणला.

तिने वडापाव दादाला दिला.

त्याला खूप तिखट लागले.

तो पाणी प्यायला घरात गेला.

(अशी ५ वाक्ये योग्य क्रमाने लिहिल्यास दोन गुण द्यावेत.)

**प्र. १९)** १) गुण – दुर्गुण/सद्‌गुण

२) लक्ष – दुर्लक्ष

(प्रत्येक योग्य उत्तरास अर्धा याप्रमाणे एक गुण)

**प्र. २०) : गोष्ट पूर्ण कर.** (गुण ५)

**क्षेत्र** : स्व–अभिव्यक्ती (लेखन)

**उद्‌दिष्ट :** स्व–अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान : प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | गोष्टीच्या सुरुवातीचा विचार न करता केलेले असबंद्‌ध लिखाण |
| १ | गोष्टीच्या सुरुवातीचा संदर्भ घेऊन वर्णन करण्याचा प्रयत्न. वाक्यरचना नीट नाही त्यामुळे संपूर्ण अर्थबोध नाही. |
| २ | पूर्ण वाक्यांत आणि दिलेल्या शब्दांशी संबंधित पण त्रोटक (एक किंवा दोन वाक्यांत) अभिव्यक्ती. |
| ३ | गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र लिखाणात फारसे नियोजन केलेले नाही. त्यामुळे लेखन विस्कळीत वाटते. |
| ४ | गोष्टीला सुसंगत मध्य आणि शेवट आहे. मात्र एकूण गोष्ट त्रोटक आहे. पात्रे, संवाद, भूमिका यांचा फारसा विचार केलेला नाही. |
| ५ | गोष्टीची सुरुवात लक्षात घेऊन सुसंगत मध्य आणि शेवट आहे. गोष्ट खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/संवाद दिलेले आहे. |

## तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :** हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे. हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे. वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :** मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

### कौशी माकडिणीची फजिती

तलावाकाठच्या आंब्याच्या झाडावर कौशी माकडीण राहायची. एके दिवशी कौशीने आईला विचारले, "आई, मी खाली जाऊ का?" आई म्हणाली, "नको! नको! उगाच कोणाची तरी खोडी काढशील." तरी ती आईचा डोळा चुकवून खाली उतरलीच. तिथे शेंगा खात बसलेल्या माणसाची पुडी तिने पळवली आणि झाडावर जाऊन बसली. तिने शेंगांची पुडी उघडली आणि बघते तर काय! नुसती शेंगांची सालंच!

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही. वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २) कौशीने माणसाकडून काय पळवलं?** (गुण १) (अ)

अ) शेंगांची पुडी

ब) आंबे

क) दोन्ही

**तोंडी प्रश्न ३) कौशीची आई तिला झाडावरून खाली उतरायला नको का म्हणाली?** (गुण १) (ब)

अ) कौशीला लागेल म्हणून

ब) कौशी खोडी काढेल म्हणून

क) कौशीला झाडावर चढता येणार नाही म्हणून

**तोंडी प्रश्न ४) कौशी माकडीण कुठे राहायची?** (गुण १) (क)

अ) जंगलात

ब) डोंगरावर

क) तलावाकाठी

**तोंडी प्रश्न ५) कौशी माकडिणीला शेंगा खायला मिळाल्या का? कशावरून?** (गुण २) (ब)

अ) हो

ब) नाही

(प्रश्न ५ चे उत्तर 'नाही' असे दिल्यावर एक गुण द्यावा. कशावरून असा प्रश्न विचारावा. योग्य उत्तर दिल्यास उर्वरित एक गुण द्यावा.)

■■■

# कौशी माकडिणीची फजिती

तलावाकाठच्या आंब्याच्या झाडावर कौशी माकडीण राहायची. एके दिवशी कौशीने आईला विचारले, "आई, मी खाली जाऊ का?" आई म्हणाली, "नको! नको! उगाच कोणाची तरी खोडी काढशील." तरी ती आईचा डोळा चुकवून खाली उतरलीच. तिथे शेंगा खात बसलेल्या माणसाची पुडी तिने पळवली आणि झाडावर जाऊन बसली. तिने शेंगांची पुडी उघडली आणि बघते तर काय! नुसती शेंगांची सालंच!